कॉलेजचे नाव :- दादासाहेब जोतिराम गोडसे आर्टस्, कॉमर्स, सायन्स कॉलेज वडूज

विद्यार्थ्याचे नाव :- पाटोळे उज्वला भानुदास

वर्ग :- बी. कॉम भाग तीन (T.Y. B.Com)

विषय :- आधुनिक व्यवस्थापन पद्धती

विषय शिक्षकाचे नाव :- गोडसे एम. ए

शैक्षणिक वर्ष :- 2022-23

Seen

FOR EDUCATIONAL USE

# प्रकल्प विषयाचे नाव

# ISO गुणवत्ता मानके

# अनुक्रमणिका


| पा.नं | घटकाचे नाव | गुण | सही |
|---|---|---|---|
| 1) | प्रस्तावना | | |
| २) | उद्देश | | |
| ३) | ISO मानकाचे महत्व | | |
| 5) | ISO गुणवत्ता मानकाचे घटक | | |
| ६) | ISO मानकाचे प्रकार | | |
| 7) | ISO मानकाचे फायदे | | |
| ८) | निष्कर्ष | | |
| ९) | संदर्भग्रंथ | | |

# प्रस्तावना

संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापन हि संकल्पना जागतिक पातळीवर राबवण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानक संघटनेतर्फे (ISO) सक्रियपणे प्रयत्न केले जात आहेत. 1990 नंतर या संघटनेने आपल्या सदस्य राष्ट्रांमध्ये व्यापक प्रमाणावर ISO गुणवत्तेचा प्रसार केला. जागतिक व्यापार संघटना व आंतरराष्ट्रीय मुद्रा निधी या जागतिक स्तरावरील संघटनांमुळे उदारीकरणास व खाजगीकरणास अधिक गती मिळाली परिणामी आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत विभिन्न देशांचे निर्बंध दूर होण्यास मदत झाली.

या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय व्यापारा-मध्ये वेगवेगळ्या देशांमधील वस्तूसाठी व सेवांसाठी गुणवत्ता प्रमाणीकरणाची नितांत गरज होती. त्यातून ISO गुणवत्ता हि संकल्पना पुढे आली. आंतरराष्ट्रीय मानक संघटनेने वस्तू व सेवांना ISO गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यासाठी काही गुणवत्ता मानक निर्धारित केले आहे. मानक संघटनेने पूर्वनिर्धारीत केलेले गुणवत्ता मानक व निकष यांच्या कसोटीस उतरणारी वस्तू किंवा सेवा म्हणजे ISO मानक होय.

# उद्देश

1) संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापन म्हणजे काय ते जाणून घेणे.

2) ISO मानकाचे कोणकोणते घटक आहेत ते जाणून घेणे.

3) ISO मानकाचे प्रकार कोणते आहेत ते जाणून घेणे.

4) ISO मानकाचे महत्त्व जाणून घेणे.

5) ISO मानकाचे फायदे जाणून घेणे.

6) ISO मानांकनविषयक सर्व माहिती घेणे व त्याचा व्यवहारातील वापर जाणून घेणे.

# ISO मानकाचे महत्व

आंतरराष्ट्रीय मानक संस्थेने सर्वप्रथम ISO गुणवत्ता मानक निर्धारीत केले आहे. ISO : 9000 या चिन्हाने ते सुरू करण्यात आले आहे. याचे महत्त्व पुढीलप्रमाणे :

1) आंतरराष्ट्रीय मान्यता :-
ISO हि गुणवत्ता मानके आंतरराष्ट्रीय मानक संघटनेतर्फे देण्यात येतात. आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनातून निर्धारीत केलेले गुणवत्तेचे निकष तपासून हि मानके अथवा चिन्हे दिली जातात.

2) गुणवत्तेची हमी :-
ISO प्रमाणचिन्हे हि वस्तूच्या किंवा सेवेच्या गुणवत्तेची हमी देतात. तेव्हा एका देशातील विशिष्ट वस्तू व सेवा अपेक्षित गुणवत्तेची आहे. की नाही हे कळण्यास मार्ग नसतो.

3) विदेशी व्यापारास चालना :-
या प्रमाणचिन्हामुळे देशी व विदेशी अशा दोन्ही बाजारपेठांमध्ये विस्तार होण्यास मदत होते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये व्यापारी मध्यस्थ, घाऊक व्यापारी व किरकोळ व्यापारी यांना आपल्या अंतिम ग्राहकास वस्तूची अथवा सेवेची उपयोगिता पटवण्यासाठी या चिन्हाचाच आधार घ्यावा लागतो.

4] ग्राहकांना संरक्षण :-
आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये गुणवत्तेस अ अनन्यसाधारण महत्व आहे. कारण विदेशी ग्राहक हा वस्तूच्या अथवा सेवांच्या गुणवत्तेबाबत अत्यंत आग्रही असतो.

5] बाजारपेठेच्या विस्तार :-
ISO गुणवत्ता चिन्हामुळे बाजारपेठेच्या विस्तार होण्यासाठी मदत होते. वेगवेगळ्या देशातील बाजारपेठ आपल्या वस्तूसाठी किंवा सेवेसाठी मिळवणे हा आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमधील आव्हानाचा भाग असतो.

6] गुणवत्ता जागृती :-
आंतरराष्ट्रीय मानक संघटना हि ISO प्रमाणपत्रे देणारी संस्था असली तरी आंतरराष्ट्रीय बाजारपेठमध्ये उत्पादक व ग्राहक दोघांमध्ये वस्तूंच्या गुणवत्तेबाबत जागरूकता निर्माण करणे महत्त्वाचे कार्य आहे.

7] गुणवत्ता नियंत्रणाची गती :-
जागतिकीकरणाच्या व उदारीकरणाच्या धोरणामुळे सर्व देशांच्या बाजारपेठा सर्वच देशांना खुल्या झाल्या जागतिक व्यापारसंघटनेच्या नियमामुळे सदस्य राष्ट्रांना आयात-निर्यात व्यापाराबाबत मनमानी करता येत नाही.

# ISO गुणवत्ता मानकाचे घटक

आंतरराष्ट्रीय मानक संघटनेने गुणवत्तेबाबत एकूण २० मानके अथवा निकष निर्धारीत केलेले आहे.

1] व्यवस्थापन जबाबदारी :-
या मानकामध्ये संस्थेच्या व्यवस्थापनाची गुणवत्तेबाबत जबाबदारी सुस्पष्टपणे परिभाषित करावी लागते.

२] गुणवत्ता कार्यप्रणाली :-
या मानकानुसार कंपनीने आपली गुणवत्ता कार्यप्रणाली ही धोरणे कार्यपद्धती व कार्यसूचना या स्वरुपात स्पष्ट केली पाहिजे.

3] ग्राहक गरजांचे पुनरावलोकन :-
या मानकानुसार कंपनीने ग्राहकांच्या गरजांचे औपचारिक स्वरुपाचे पुनरावलोकन करणे अपेक्षित आहे.

4] प्रारुप नियंत्रण :-
कंपनीने आपल्या वस्तूची प्रारुप प्रक्रिया बिनचूकपणे नियोजित केलेली असावी व त्याचे दस्तरोवज तयार केलेले असावे.

5] दस्तरोवज नियंत्रण:-
ISO चिन्हासाठी दस्तरोवज महत्वाचे आहे.



REEGAL INDUSTRIES

# ISO प्रमाणकाचे प्रकार

| | |
|---|---|
| • ISO 13485 | वैद्यकीय उपकरणे |
| • ISO 9001-2008 | गुणवत्ता व्यवस्थापन |
| • ISO 26000 | सामाजिक जबाबदारी |
| • ISO 14001 | पर्यावरण व्यवस्थापन |
| • ISO 50001 | ऊर्जा व्यवस्थापन |
| • ISO 27001 | माहिती सुरक्षा व्यवस्थापन |
| • ISO 22000 | सुरक्षा आणि आरोग्य सेवा. |

FOR EDUCATIONAL USE

# ISO मानकाचे फायदे

- उत्पादनाची कार्यक्षमता वाढवण्यास मदत करते.
- अनावश्यक खर्च टाळता येतो.
- पर्यावरणीय प्रभाव कमी करते.
- तुमची प्रणाली, डेटा आणि प्रतिष्ठा संरक्षित करते.
- ग्राहक समाधानावर विशेष लक्ष देऊन त्रुटी दूर करते.
- विमा प्रिमीयम कमी केला जाऊ शकतो.
- लहान आणि मोठ्या दोन्ही संस्थांसाठी योग्य.
- अधिक विश्वसार्ह उत्पादन. शेड्यूलिंग आणि वितरण.
- ग्राहकांना प्रथम ठेवण्यास मदत करते.
- उत्तम दर्जाची उत्पादने आणि सेवा देण्यात लक्षित.

FOR EDUCATIONAL USE

# निष्कर्ष

1) संपूर्ण गुणवत्ता व्यवस्थापनविषयक सर्व माहिती पूरेपूररीत्या मिळाली व माहित झाली.

2) ISO मानांकनाचे प्रकाराविषयी माहिती झाली.

3) ISO मानांकनाच्या घटकांचा परिचय झाला.

4) ISO मानकाचे महत्त्व समजले.

5) ISO मानकाच्या विविध फायद्यांविषयी माहिती मिळाली.

6) ISO मानकाविषयीची सर्व माहिती जाणून घेऊन त्याचा व्यवहारात कसा उपयोग होतो हे समजले.

FOR EDUCATIONAL USE

# संदर्भग्रंथ


1) https://worldofmarathi.in > iso-full-form.

2) https://maratimv.blogspot.com.

3) आधुनिक व्यवस्थापन विषयक पाठ्यपुस्तक.

4) आधुनिक व्यवस्थापन विषयाच्या शिक्षिका भोसले एम. ए.

5) गटचर्चेतून माहिती मिळाली.

6) Google


FOR EDUCATIONAL USE